दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक २८ मंगळवार दि.२९ जुलै २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## भारताला एकाही देशाचा पाठिंबा का नाही?:ठाकरे गटाचा संसदेत मोदी सरकारच्या परराष्ट्र धोरणावर आसूड; पहलगाम हल्ल्यावरून खडेबोल

मुंबई– लोकसभेत बोलताना शिवसेना ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सवाल उपस्थित केला. ऑपरेशन सिंदूर वरून केंद्र सरकारवर अरविंद सावंत यांनी हल्लाबोल केल्याचे पाहायला मिळाले. याच सोबत भारतीय सैन्याचे कौतुक देखील केले.

अरविंद सावंत म्हणाले, जेव्हा ऑपरेशन सिंदूर बद्दल बोलले जात, तेव्हा पहिल्यांदा तर हे का झाले असा प्रश्न आहे. पहलगाम हल्ला झाला आणि त्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर केले. मी काही काळासाठी मंत्री होतो आणि जेव्हा काश्मीरमध्ये गेलो होतो इलेक्ट्रिक बसेसचे उद्घाटन करायला. तेव्हा ठिकठिकाणी पोलिस तैनात होते, तसेच सशस्त्र जवान उपस्थित होते. मग पहलगामचा हल्ला झाला तेव्हा तिथे कोणीच कसे नाही? पोलिस नाही, जवान नाही? पर्यटक आले होते त्यांच्या सुरक्षेसाठी कोणीच कसे नाही? सैन्याला आदेश कोणी दिले होते तिथून जाण्यासाठी? इथून तपास झाला पाहिजे.

मंत्री असताना मी सुद्धा पहलगामला गेलो होतो. एवढे मोठे मैदान आहे तिथे. मी गेलो तेव्हा तिथे पोलिस होते जवान होते. मग त्या दिवशी सगळे जवान कुठे गेले होते? हे आतंकवादी कुठून आले होते? या पूर्वी देखील अनेक आतंकवादी हल्ले झाले आहेत. मुंबईच्या साखळी ब्लास्टमधल्या अनेकांना निर्दोष मुक्त केले. याचा अर्थ असा की आपण आतंकवादी म्हणून निर्दोष लोकांना पकडले होते. आपण आतंकवाद्यांना पकडू शकलो नाही.

आतंकवादी अजूनही पकडले गेले नाहीत

काश्मीरचे सत्यपाल मलिक जेव्हा राज्यपाल होते, तेव्हा त्यांनी सरकारला वेळोवेळी सांगितले की काहीतरी गडबड आहे. या सीआरपीएफ जवानांना विमान देण्यात यावे. पण या सरकारने दिले नाही. त्यांनी पंतप्रधानांशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला. पण, आपले प्रधानमंत्री कॉर्बीट पार्कमध्ये होते. एवढा मोठा हल्ला झाला, ते तिथे नाही गेले. ते आधी दिल्लीला गेले, तिथून दुसऱ्या एका कार्यक्रमाला गेले. पुलवामाच्या हल्ल्यापूर्वी सत्यपाल मलिक सारखं सारखं म्हणत होते गडबड होणार आहे आणि तुम्ही जवानांना विमान न देता रस्त्याच्या मार्गाने पाठवले. ४० जवान शहीद झाले. आजपर्यंत पकडले गेले नाहीत आतंकवादी.

बिनशर्त युद्धबंदी कसे काय केले? ऑपरेशन सिंदूर नाव देऊन भावनांशी खेळत आहात. सिंदूर कोणाचे पुसले गेले आपल्या बहीणींचे. त्या आतंकवाद्यांना आजपर्यंत पकडू शकले नाहीत आणि सिंदूर नाव देता. आपण दहशतवाद्यांवर हल्ले केले मी मान्य करतो. पण हे आतंकवादी पकडले गेले नाहीत. तुम्हाला काही वाटत नाही? असे म्हणत अरविंद सावंत यांनी थेट मोदींनाच सवाल केला. बिहारमध्ये जाऊन इंग्रजीत भाषण करता, पहलगाममध्ये अजून गेले नाहीत. आजपर्यंत मणिपूरला सुद्धा गेले नाहीत. तुम्हाला वेदना नाही होत का? दुःख नाही होत? त्रास नाही होत? लाज नाही वाटत? आणि इथे ढोल वाजवत बसतात. तुम्ही जर मोकळीक दिली होती तर बिनशर्त युद्धबंदी कसे काय केले? बिनशर्त का युद्धबंदी केली?



एक देश सुद्धा आपल्यासोबत नाही उभे राहिले

आपली सगळ्यात मोठी वाईट गोष्ट ही आहे की एक राष्ट्र सुद्धा आपल्यासोबत बोलत नाही. आपण तर विश्वगुरु म्हणवतो स्वतः ला. विविध देशांमध्ये जाऊन युद्धावर बोलून आलो. पण एक देश सुद्धा आपल्यासोबत नाही उभे राहिले. ते इस्त्राइल तरु उभे राहिले का आपल्या बाजूने? त्याच्यासाठी आपण इराकला विरोध केला. तो इराक जो आपल्याला तेल देतो, पैसे नंतर द्या म्हणतो पण तेल घ्या म्हणतो. त्या इराकसोबतचे संबंध सुद्धा बिघडले. हे आहे आपले परराष्ट्र धोरण!

जी७ मध्ये सुद्धा नाही बोलावले आपल्याला

हल्ले झाले तेव्हा पाकिस्तानच्या बाजूने चीन होते, तुर्की होते. आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे, आपल्या बाजूने एकही देश का उभे राहत नाही? आपण काय वाईट केले आहे? नेमके युद्धाच्या वेळी इंटरनॅशनल मोनिट्रिंग फंड पैसे देतो पाकिस्तानला. याचा अर्थ आपल्या देशाची काय स्थिती आहे जगात? जी७ मध्ये सुद्धा नाही बोलावले आपल्याला. युद्धाच्या वेळी आमचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी आम्हाला आदेश दिले होते ही वेळ राजकारण करण्याची नाही. आपण पंतप्रधान मोदींना पाठिंबा दिला पाहिजे. युद्धानंतर आपण टीम पाठवल्या काय झाले? त्या देशांमध्ये पत्रकार परिषद झाली? कोणी समोर येऊन पाठिंबा दिला? कोणी नाही आले. सगळं व्यर्थ ठरले, हे आमचे दुःख आहे. राष्ट्राची गोष्ट असेल आम्ही सोबत आहोत.

इंदिरा गांधींनी पाकिस्तानला धडा शिकवला होता

पाकिस्तान व्याप्त काश्मीर जिंकण्यासाठी आपल्याकडे संधी होती. ज्या पद्धतीने इंदिरा गांधींनी पाकिस्तानला धडा शिकवला त्याचप्रमाणे धडा शिकवण्याची संधी आपल्याकडे होती. तुम्ही जर तसे केले असते तरी आम्ही मोदींनी डोक्यावर घेऊन नाचलो असतो. पण तुम्ही ती संधी घालवली. 'घुसके मारेंगे' ही भाषा भाजपकडून सातत्याने वापरली जाते. पण ओसामा बिन लादेनला जसे मारले ते खरे 'घुसके मारेंगे'. ज्या पाकिस्तानने भारताविरोधात दहशतवादी हल्ले केले त्या पाकिस्तानसोबत क्रिकेट खेळणे बंद करा.

## बुलढाण्यात दलित तरुणाला अर्धनग्न करून मारहाण:गाय चोरल्याचा होता संशय, खामगावातील घटना; दलित संघटनांनी व्यक्त केला संताप





बुलढाणा– बुलढाण्याच्या खामगावात एका तरुणाला गाय चोरल्याच्या संशयावरून अर्धनग्न करून मारहाण करण्यात आल्याची संतापजनक घटना घडली आहे. दलित संघटनांनी या प्रकरणी तीव्र संताप व्यक्त करत सरकारला आरोपींवर कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, खामगाव शहरातील बसस्थानक परिसरातून शुक्रवारी रात्री एका २४ वर्षीय दलित तरुणाचे अपहरण करण्यात आले. त्यानंतर त्याला जवळच्याच मैदानात नेऊन जबर मारहाण करण्यात आली. यावेळी त्याला त्याचा धर्म व जात विचारण्यात आली. त्यानंतर त्याला विवस्त्र करून त्याचे गायींसोबत फोटो व व्हिडिओही काढण्यात आले. हल्लेखोरी एवढ्यावरच थांबले नाही. त्यांनी त्याला पुन्हा दुसऱ्या एका ठिकाणी नेले. तिथेही त्याला विवस्त्र करून मारहाण करण्यात आली. पण त्याचवेळी अचानक गस्तीवर असणारी पोलिस व्हॅन तिथे धडकली. त्यामुळे त्या तरुणाचे प्राण वाचले. या घटनेत पीडित तरुणाचा एक डोळा निकामी झाला असून, नाकाचेही हाड मोडले आहे. सध्या त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

गाय चोरल्याच्या संशयावरून मारहाण सदर तरुणाला गाय चोरल्याच्या संशयावरून मारहाण करण्यात आली आहे. शिवाजीनगर पोलिसांनी या प्रकरणी ३ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. यापैकी दोघांना तत्काळ बेड्याही ठोकल्या आहेत. तिसरा आरोपी अद्याप फरार आहे. त्याचा कसून शोध घेतला जात आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, रोहन पैठणकर असे पीडित तरुणाचे नाव आहे. तो एका हॉटेलवर वेटर म्हणून काम करतो. तो त्याच्या कुटुंबातील एकमेव कमावता सदस्य आहे.

आरोपींच्या घरावर बुलडोझर चालवण्याची मागणी राज्यभरातील दलित संघटनांनी या घटनेचा तीव्र संताप व्यक्त केला आहे. तसेच आरोपींवर कडक कारवाई करण्याची मागणीही केली आहे. ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार यांनी या प्रकरणी तीव्र संताप व्यक्त केला आहे. दीपक केदार याविषयी बोलताना म्हणाले की, हल्लेखोरांनी तरुणाला तुझा धर्म कोणता? तू गाय चोर आहेस असे म्हणत मारहाण केली. त्याचा धर्म तपासण्यासाठी त्याला नग्न करण्यात आले. पीडित तरुणावर प्राणघातक हल्ला करणारे आरोपी अतिरेकी आहेत. त्यांनी धर्म विचारून मारहाण केली. त्यामुळे त्यांच्यावर मकोका अंतर्गत कारवाई झाली पाहिजे. त्यांचे घर बुलडोझरने पाडले पाहिजे. अन्यथा राज्यभरात वाईट परिणाम होतील. जनावरांच्या नावाखाली माणसांना मारणाऱ्या या प्रवृत्तीला ठेचल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, असे ते म्हणालेत. दीपक केदार लवकरच पीडित तरुणाची भेटही घेणार आहेत.



श्रावणाच्या पहिल्या सोमवारी ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थान येथे भाविकांच्या रांगा

## भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा बुधवारी महमदापूर येथे जनता दरबार

लातूर : – लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत येत्या ३० जुलै २०२५ बुधवार रोजी लातूर तालुक्यातील मौजे महमदापूर येथे जनता दरबारचे आयोजन करण्यात आले आहे. दर तीन महिन्याला लातूर ग्रामीण मतदार संघात चार ठिकाणी जनता दरबार घेण्यात येणार असल्याचे आ. रमेशआप्पा कराड यांनी घोषित केले असून लातूर तालुक्यातील मुरुड येथे नुकताच जनता दरबार घेण्यात आला या कार्यक्रमास जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला बऱ्याच जणांचे प्रश्न जागेवरच निकाली निघाले तर अनेक प्रश्नांना सोडविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.



येत्या ३० जुलै २०२५ बुधवार रोजी लातूर तालुक्यातील मौजे महमदापूर येथे भातांगळी, बोरी, महापूर, महाराणा प्रताप नगर या पंचायत समिती गणातील विविध प्रश्नांच्या अनुषंगाने आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत जनता दरबारचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील जनता दरबार ममदापूर पाटी येथील श्री हनुमान मंदिर सभागृह येथे सकाळी १० वाजता जनता दरबारचे आयोजन करण्यात आले आहे. तेव्हा ग्रामीण भागातील जनतेने आपल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी जनता दरबार येथे आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मुरुड उपजिल्हा रुग्णालय इमारतीचे काम गुणवत्तापूर्वक व दर्जेदार वेळेत पूर्ण करावे

### आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून कामाची पाहणी करून संबंधितांना दिल्या सूचना

लातूर :– लातूर तालुक्यातील मौजे मुरुड येथे महायुती शासनाने मंजूर केलेल्या २५ कोटी ४७ लक्ष रुपये खर्चाच्या उपजिल्हा रुग्णालय इमारत बांधकामाची लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी नुकतीच पाहणी करून सदरचे काम गुणवत्तापूर्वक आणि दर्जेदार वेळेत पूर्ण करावे अशा सूचना संबंधित बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसह ठेकेदारांना दिल्या.

लातूर तालुक्यातील मुरुड आणि मुरुड परिसरातील ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या ग्रामीण रुग्णालयाचे भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून मागील काळात राज्यातील महायुती शासनाने उपजिल्हा रुग्णालयास श्रेणीवर्धन विशेष बाब म्हणून मान्यता दिली. सदर कामासाठी २५ कोटी ४७ लाख रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली.

मुरुड उपजिल्हा रुग्णालय इमारतीचे प्रत्यक्षात काम सुरू झाले असून या नियोजित दोन मजली ५० खटाच्या उपजिल्हा रुग्णालय इमारतीत तळमजल्यावर विविध आजाराचे स्वतंत्र तपासणी विभाग, प्रयोगशाळा, रक्तपेढी, अपघात विभाग, औषधालय, नाव नोंदणी, भांडार विभाग, प्रतीक्षालय, प्रशासकीय कार्यालय त्याचबरोबर पहिल्या मजल्यावर एकूण चार वार्ड,



शस्त्रक्रिया कक्ष, डॉक्टर व आधिपरिचारिका यांचे कक्ष असून या इमारतीत उद्‌वाहक (लिफ्ट) आणि जिना यासह सर्व सोयींनी युक्त असे सुसज्ज बांधकाम करण्यात येणार आहे. या कामाची लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी नुकतीच पाहणी केली. याप्रसंगी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता एस. के. तांबोळी आणि ठेकेदार अभिषेक हलकुडे यांनी बांधकामाच्या कामाबाबतची सविस्तर माहिती दिली.

होत असलेले कामाबाबत समाधान व्यक्त करून सदरील बांधकाम गुणवत्तापूर्वक दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करावे अशा सूचना देऊन या कामात कसल्याही प्रकारची तडजोड होता कामा नये असे यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले. यावेळी तहसीलदार सौदागर तांदळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. आर. व्ही. गलांडे, वैद्यकीय अधिकारी डॉ. श्वेता शेळके, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता एस. के. तांबोळी, कनिष्ठ अभियंता ए. बी. वाघमारे, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, मुरुडच्या सरपंच श्रीमती अमृताताई अमर नाडे, उपसरपंच हनुमंतबापू नागटिळक, भाजपाचे मंडल अध्यक्ष सुरज शिंदे, मुरुड शहराध्यक्ष वैभव सापसोड, रुग्णालय प्रभारी नीता मगरे, शालु गायकवाड, ठेकेदार अभिषेक हालकुडे, भाजपा माजी अध्यक्ष बन्सी भिसे, ग्रामपंचायत सदस्य महेश कणसे, लता भोसले, संतोष काळे, अश्रुबा चव्हाण यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

# मलेरियावरील प्रतिबंधात्मक लस

भारताने आरोग्य विज्ञानाच्या क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण यश मिळवले आहे. भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद आणि भुवनेश्वर येथील प्रादेशिक वैद्यकीय संशोधन केंद्राच्या शास्त्रज्ञांनी मिळून मलेरियावर नियंत्रण मिळवण्यासाठी देशातील पहिली स्वदेशी लस विकसित केली आहे. ही लस केवळ उपचारात्मक नाही, तर प्रतिबंधात्मक आहे. कारण, ती मलेरियाचा परजीवी रक्त प्रवाहात शिरण्याच्या आधीच त्याला रोखण्याची क्षमता ठेवते. ही क्रिया केवळ वैयक्तिक पातळीवर नाही, तर संपूर्ण समाजात संसर्ग प्रसार थांबविण्यात मदत करणारी आहे. एडफाल्सीव्हॅक्स नावाची ही लस शरीरात मजबूत अँटिबॉडीज तयार करते आणि त्या प्लास्मोडियम फॅल्किपॅरम या मलेरियाच्या प्रमुख परजीवींना नष्ट करण्याचे काम करतात. पारंपरिक लसी हे कार्य परजीवी शरीरात शिरल्यानंतर करतात; पण ही नवी लस परजीवीचे प्रवेशद्वारच बंद करते. या लसीत लॅक्टोकोकस लॅक्टिस नावाचा एक विशेष जीवाणू वापरण्यात आला आहे. हा जीवाणू सामान्यतः पनीर आणि ताक यांसारख्या खाद्यपदार्थांच्या निर्मितीत वापरला जातो आणि मानवी शरीरासाठी सुरक्षित आहे. त्यामुळे जैविक प्रणाली आधारित ही लस घातक दुष्परिणाम करणारी ठरणार नाही. आयसीएमआरच्या माहितीनुसार, सध्या मलेरियावरील जागतिक बाजारात दोन लसी उपलब्ध असून या दोन्ही लसींची परिणामकारकता ३३ ते ६७ टक्क्यांदरम्यान आहे. त्यांच्या तुलनेत भारतीय लसीचा प्रभाव दुहेरी स्वरूपाचा आहे. म्हणजेच, रक्तात परजीवी पोहोचण्यापूर्वीच त्याला रोखणे आणि समुदायस्तरावर संसर्गाचा प्रसार थांबवणे ही दोन वैशिष्ट्ये एडफाल्सीव्हॅक्स लसीला जागतिक स्तरावर अत्यंत प्रगत स्थान देतात.

या लसीचे आणखी एक विशेष महत्त्व म्हणजे, तिची स्वदेशी निर्मिती. आतापर्यंत भारताला मलेरियावरील उपचारासाठी आयातीत लसींवर आणि औषधांवर अवलंबून राहावे लागत होते. हे केवळ खर्चिकच नव्हते, तर देशाच्या सार्वजनिक आरोग्य नीतीच्या दृष्टीनेही अस्थिरतेची जोखीम असणारे होते. या पार्श्वभूमीवर नवी लस हा मेक इन इंडियाचा आरोग्य क्षेत्रातील अत्यंत यशस्वी प्रयोग ठरू शकतो. लसनिर्मितीची पुढील प्रक्रिया खासगी कंपन्यांशी करार करून सुरू करण्यात आली आहे, जेणेकरून ती लवकरात लवकर बाजारात उपलब्ध होईल.

भारतीय आयुर्विज्ञान परिषद गेली अनेक दशके डासजन्य रोगांविरोधात संशोधनात कार्यरत आहे. विशेषतः मलेरिया, डेंग्यू, चिकुनगुनिया, झिका अशा आजारांविरुद्ध सतत लस संशोधन आणि औषध पद्धती विकसित केल्या जात आहेत. भुवनेश्वर येथील आयएमआरसी संस्थेने या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांनी प्रादेशिक परिस्थितीनुरूप संशोधन आणि वैद्यकीय गरजांनुसार नवे प्रयोग करून हे यश साध्य केले आहे. मलेरियावरची ही लस आरोग्यव्यवस्थेच्या खर्चात मोठी घट घडवू शकते. ग्रामीण भागात मलेरियामुळे दरवर्षी हजारो लोक दगावतात आणि लाखो कुटुंबे आर्थिकदृष्ट्या परावलंबी होतात. ही लस केवळ त्या मृत्यूंना रोखणार नाही, तर उपचाराचा खर्च देखील मोठ्या प्रमाणात कमी करेल. शाळकरी मुले, गरोदर स्त्रिया आणि कृषी कामगार यासारख्या संवेदनशील गटांसाठी ही लस आयुष्यदायी ठरू शकते. सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातूनही ही लस गरिबांपर्यंत पोहोचवणे आवश्यक ठरेल. जागतिक आरोग्य संघटनने मलेरियावर नियंत्रणासाठी लसीकरणाला सर्वोच्च उपाय म्हणून मान्यता दिली आहे. सध्या मंजूर असलेल्या दोन लसींपैकी मॅट्रिक्स एम२ लस ही २०२२ मध्ये घाना आणि नायजेरियामध्ये वापरात आणली गेली आहे.

# स्मरण ‘ऑपरेशन विजय’चे!

२६ जुलै म्हणजे शूर भारतीय सैन्याने कारगिलमध्ये पाकिस्तानचे कटकारस्थान उधळून लावल्याचा स्मरण दिवस. १९९९ मध्ये पाकिस्तानी सैन्याला पिटाळून लावले होते.

कारगिल युद्ध (ऑपरेशन विजय) ३ मे १९९९ रोजी सुरू झाले आणि २६ जुलै १९९९ रोजी संपले. जवळपास तीन महिने चाललेले हे युद्ध भारतीय सैन्याने अतिशय प्रतिकूल परिस्थिती असूनही दिमाखात जिंकले. ‘दिमाखात जिंकले’ असं म्हणण्याचं कारण की पाकिस्तानने दगाबाजी करून कारगील भाग ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, भारताने यशस्वीपणे सुमारे साडेपाचशे सैनिकांचे बलिदान देऊन विजय संपादन केला. या युद्धात कमालीचे शौर्य दाखवणार्या भारतीय सैन्यातील अधिकारी कॅप्टन बात्राचे ‘ये दिल मांगे मोअर’ हे वाक्य याकाळी कमालीचे लोकप्रिय झाले होते.

काश्मीर खोर्यातील हा भाग समुद्रसपाटीपासून १० ते १६ हजार फूट उंचीवर आहे. उंच पर्वतराजींनी वेढलेल्या द्रास –कारगिल सेक्टरमध्ये प्रत्यक्ष नियंत्रण रेषा आहे. भारत–पाक सीमेवरील हा सर्वात कळीचा भाग. याआधी तीन वेळा भारत––पाक सैन्य एकमेकांना १९४७, १९६५ आणि १९७१ साली भिडले होते. म्हणून या भागात कडक पहारा दिला जातो. मात्र, हा कडक पहारा वर्षाच्या काही महिन्यांत आपोआप कमी केला जातो. हे लक्षात घेऊन पाकिस्तानने मार्च–एप्रिल १९९९ मध्ये या भागातील मोक्याच्या ठिकाणी शिरकाव केला आणि ठाणी भक्कम केली. दुर्दैवाने भारतीय सैन्य कमालीचे गाफील राहिले. यात आपल्या गुप्तहेर खात्याचे अपयश दडलेले आहेच.



या युद्धाचे तपशील समोर ठेवल्याशिवाय भारतीय सैन्याच्या पराक्रमाचा अंदाज येणार नाही. पाकिस्तानी सैन्य कारगिल भागात हिमालय पर्वताच्या उंच भागात तर भारतीय सैन्य खाली खोर्यात, अशी अतिशय प्रतिकूल स्थिती. यातील विश्वासघाताचे तपशीलसुद्धा चर्चेत आणले पाहिजे. फेब्रुवारी १९९९ मध्ये पंतप्रधान वाजपेयी लाहोर भेट सुरू असतानाच प्रत्यक्ष नियंत्रण रेषा ओलांडण्याचा कट आखण्यात आला. यातील विश्वासघात करण्याची मानसिकता स्पष्ट दिसते.

१९९८ सालच्या मे महिन्यात भारताने दुसरा अणुस्फोट केला. मे १९७४ मध्ये भारताने पहिला अणुस्फोट केला होता. तेव्हा पाकिस्तानकडे अणुबॉम्ब नव्हता. मे १९९८ मध्ये मात्र पाकिस्तानने भारतापाठोपाठ अणुस्फोट केला. यामुळे जगभर खळबळ माजली. या अणुस्फोटांमुळे दक्षिण आशियाचे राजकारण आमूलाग्र बदलले. आता भारत आणि पाकिस्तान हे शेजारी आणि शत्रूराष्ट्र अण्वस्त्रधारी झाले होते. यामुळे अमेरिकादी पाश्चात्य देश अस्वस्थ झाले होते. भारत–पाकिस्तानातील शत्रुत्वामुळे इतर देश अस्वस्थ झालेले होते.

१९७१ मध्ये बांगलादेशचा जन्म झाल्यापासून पाकिस्तान आतून धुमसत होता. त्यात १९८४ मध्ये सियाचीन घेतल्यापासून तर पाकिस्तान कमालीचा चिडला होता. यासर्वांचा सूड घेण्यासाठी आणि काश्मीर एकदाचे मुक्त करण्यासाठी पाकिस्तानने कारगिलमध्ये हल्ला केला होता. आता जर कारगिल भागात अचानक हल्ला करून लचका तोडला तर भारत काही करू शकणार नाही, असा पाकिस्तानचा होरा होता. पण भारतातील राजकीय नेतृत्वाने आणि सैन्याने पाकिस्तानच्या हेतूंवर पाणी ओतले.

या प्रकरणात भारतीय नेतृत्वाने कमालीचा संयम बाळगला. तेव्हाचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींनी लष्कराला ज्या धोरणात्मक सूचना दिल्या होत्या त्यानुसार लष्कराने भारतीय भागात शिरलेल्या घुसखोरांना हाकलून द्यायचं पण कोणत्याही परिस्थितीत प्रत्यक्ष नियंत्रण रेषा ओलांडायची नाही. यामुळे भारताने ही लढाई कारगिल क्षेत्रापुरतीच सीमित ठेवण्यात यश मिळवले. याबद्दल तेव्हाचे लष्करप्रमुख जनरल मलिक यांनी सूचक उद्गार काढले होते ‘या सूचना म्हणजे एक हात पाठीला बांधून लढण्यासारखे होते’. असे असले तरी भारतीय सैन्याने अतुलनीय शौर्य दाखवत पाकिस्तानला नामोहरम केले.

या लढाईचे एक वैशिष्ट्य म्हणजे भारतीय आणि जगभरच्या लोकांनी हे युद्ध दूरदर्शनच्या पडद्यावर घरात बसून बघितले. माध्यम तज्ज्ञांच्या मते १९९०–१९९१ मध्ये झालेले आखाती युद्ध हे पहिले जे जगातल्या लोकांनी सी.एन.एन. या अमेरिकन वाहिनीच्या सौजन्याने घरात बसून क्रिकेटची मॅच बघावी तसे बघितले होते. याचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे भारत सरकारने बोफोर्स तोफांची पुन्हा खरेदी केली.

या बोफोर्स तोफा पंतप्रधान राजीव गांधींच्या कारकिर्दीत वादग्रस्त ठरल्या होत्या. भाजपा वगैरे विरोधी पक्षांनी बोफोर्स तोफांच्या खरेदीत भ्रष्टाचार झाला, लष्करासाठी विकत घेतलेल्या या तोफा कमअस्सल आहेत असे आरोप केले होते. खरेदीतील भ्रष्टाचार हा आरोप वेगळा आणि कमअस्सल तोफा खरेदी केल्या हा आरोप आणखीच वेगळा. वाजपेयी सरकारने बोफोर्सच्या तोफा पुन्हा खरेदी करून या तोफा अस्सल आहेत याची एकप्रकारे कबुलीच दिली.

या युद्धाला आंतरराष्ट्रीय आयाम प्राप्त झाले होते. दोन अण्वस्त्रधारी देशांतील युद्धात आततायीपणाने दोघांनी जर अण्वस्त्रं वापरली तर याचे परिणाम भारत––पाकिस्तान यांच्यापलीकडेसुद्धा होतील याचा जागतिक समुदायाला अंदाज होता. म्हणूनच अमेरिकेचे तेव्हाचे अध्यक्ष बिल क्लिंटन यांनी मध्यस्थी केली. यासाठी त्यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान नवाज शरीफ यांनी तातडीने अमेरिकेला बोलावून घेतले. या बैठकीत क्लिंटन यांनी शरीफ यांना स्पष्ट शब्दांत ‘जैसे थे’ परिस्थिती निर्माण करण्याच्या सक्त भाषेत सूचना केल्या. पाकिस्तानने बिनशर्त माघार घेण्यामागे हेसुद्धा एक कारण होते.

हे युद्ध जरी भारताने जिंकले तरी यातून भारतीय लष्करातील त्रुटी चव्हाट्यावर आल्या. याची सर्वांची खोलवर चौकशी करण्यासाठी सरकारने लष्करी तज्ज्ञ के. सुब्रमण्यम समिती गठित केली. या समितीने सहा महिन्यांत अहवाल सादर केला. त्यातील एक महत्त्वाची सूचना म्हणजे पंतप्रधान यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली ज्यात संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री आणि परराष्ट्रमंत्री असतील. शिवाय देशातला पूर्ण वेळ राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार असले पाहिजे ही एक सूचना होती. तिसरी महत्त्वाची सूचना म्हणजे देशात ‘चिफ ऑफ डिफेन्स स्टाफ’ (सीडीएस) हे पद निर्माण केले पाहिजे. प्रत्यक्षात हे पद निर्माण होण्यासाठी पुढे २० वर्षे जावी लागली.

कारगिल युद्धादरम्यान बटबटीतपणे समोर आले ते भारतीय गुप्तहेर खात्याचे अपयश. भारतीय लष्करी अधिकार्यांना पाकिस्तानी सैन्य कारगिल क्षेत्रात घुसखोरी करत आहे आणि मोक्याच्या टेकड्यांवर लष्करी ठाणे बांधत आहेत वगैरे माहिती एक मेंढपाळ मुलाने दिली होती! परिणामी गुप्तहेर खाते सक्षम केले पाहिजे हीसुद्धा सुब्रमण्यम समितीची सूचना होती. एवढेच नव्हेतर तिन्ही सैन्य दलांत नवी आणि प्रगत तंत्रज्ञानावर आधारित सामग्री घेण्यात आली आहे.

भारताला पश्चिम सीमेवर (पाकिस्तान) आणि उत्तर सीमेवर (चीन) जास्त लक्ष द्यावे लागते. नवीन सामग्रीमुळे हे शक्य झाले आहे. आधुनिक काळ हा तंत्रवैज्ञानिक काळाचा आहे. यामुळे लष्करी तंत्रज्ञानातसुद्धा झपाट्याने बदल होत असतात. त्यांच्या मागोवा घेत भारतीय लष्कराला आगेकूच करावी लागणार आहे. शिवाय भारताला एका बाजूला पाकिस्तान आणि दुसरीकडे चीन या दोन शत्रूंवर एकाच वेळी लक्ष द्यावे लागते. या दोन देशांची मैत्री १९६३ सालापासून आहे. अशा स्थितीत भारताला सदैव जागरूक राहावे लागते.

# बोगसगिरी नको

बिहार विधानसभेच्या मागच्या निवडणुकीत २० टक्के जागांचा निकाल केवळ अडीच टक्के अथवा त्यापेक्षा कमी मतांनी लागला होता. १७ जागांवर विजयी आणि पराभूत उमेदवारांमधील अंतर केवळ १ टक्का किंवा त्यापेक्षाही कमी होते. या राज्यात आता निवडणूक आयोगाकडून विशेष मतदार यादी पडताळणी मोहीम राबवली जाते आहे. त्यावरून प्रचंड गदारोळ सुरू आहे. निवडणूक आयोगाच्या हेतूबद्दल शंका घेतली जाते आहे. काही महिन्यांपूर्वी जर तुम्ही याच मतदार यादीवरून लोकसभा निवडणूक घेतली, तर आता विधानसभा निवडणुकीच्या वेळीच आयोगाने फेर पडताळणीची टूम का काढली, असा सवाल आहे. विरोधी पक्षांना यात फसवेगिरी आणि बोगसगिरीचा वास येतो आहे. पाटण्यापासून दिल्लीपर्यंत ओरड सुरू आहे. विरोधी पक्षांचा मुद्दा रास्त असला, तरी निवडणूक आयोगही यावेळी पूर्ण तयारीत आहे. त्यांनी बिहारमधील मतदार यादीतील बनवेगिरीच आकडेवारीसह समोर आणली आहे.

मतदार यादीत तब्बल ७७ लाख बोगस मतदार आहेत, असे आयोगाचे म्हणणे आहे. राज्याच्या विधानसभेच्या २४३ जागांचा विचार करता प्रत्येक मतदार संघात जवळपास ३० हजार बोगस मतदार आहेत. २०२० च्या निवडणुकीतील विजयी आणि पराभूत उमेदवारांतील फरक पाहता प्रत्येक मतदार संघातील बोगस मतांचा आकडा त्या मतदार संघाचा निकाल फिरवण्यासाठी पुरेसा आहे. आयोगाने मतदार यादीच्या शस्त्रक्रियेसाठी जी वेळ निवडली आहे त्याला विरोधी पक्षांचा आक्षेप आहे. एका अर्थाने दोन्ही बाजू आताच्या निवडणुकीत कोणता बोगस प्रकार होऊ नये यासाठीच लढत आहेत, तथापि, परस्परांचे दृष्टिकोन त्यांना मान्य करायचे नाही. कोणत्याही निवडणुकीत बोगस प्रकार होता कामा नये अशी अपेक्षा असते. आजवर झालेल्या निवडणुकांत बोगस प्रकार झालेच नाही असा दावा करण्याचे धाडस कोणातच नाही. अगदी मतपेट्या पळवण्यापासून मतदान केंद्रे ताब्यात घेण्यापर्यंत सगळे प्रकार भारतात विशेषत: बिहारमध्ये जंगलराज होते त्यावेळी पाहिले गेले. हे होऊनही निवडणुकांचे निकाल स्वीकारले गेले.



राज्यकर्त्यांना गरिबांचे मसिहा बनवले गेले आणि त्यांनी मनमानी पद्धतीने राज्यही चालवले. केंद्रातील खिचडी सरकारांवर दबदबाच नाही तर दहशत ठेवली. हा फार जुना इतिहास नाही. त्यावेळच्या आणि आजच्या स्थितीत बदल एवढाच आहे की त्यावेळेचे निवडणुकांचे निकाल ओरबाडून घेतले गेले असले तरी त्यांना लोकशाहीचा कौल म्हणून स्वीकारले गेले. याउलट आता मात्र निवडणूक आयोगावरच प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्या संस्थेला दूषणे दिली जात आहे. योग्य तेव्हाही नव्हते आणि आताही नाही. मात्र विरोधाचा आणि आक्षेपाचा एक मार्ग असतो जो स्वीकारून चर्चा केली जाऊ शकते. ते आता मान्य होत नाही. आयोग या संस्थेवरचा विश्वासच डळमळीत करायचा आहे. त्याहीपुढे मतदारांमध्ये तुमचे मत कापले जाईल असे भय निर्माण करायचे आहे असे स्पष्ट दिसते. आयोगाने बिहारमध्ये आता जी पडताळणी केली आहे त्यात जवळपास ७ लाख मतदार असे आहेत की त्यांची नावे एकापेक्षा जास्त मतदार याद्यांमध्ये आहेत.

तब्बल ३५ लाख मतदार त्यांनी जो पत्ता दिला आहे तेथे राहतच नसल्याचे आढळून आले आहे. जवळपास १२ लाख ५५ हजार मतदारांचे निधन झाले आहे, तरीही त्यांची नावे मतदार यादीत आहेत. १८ लाख मतदारांनी त्यांचे जेथील यादीत नाव आहे ते ठिकाण कायमचे सोडले आहे. अशी एकूण ७० ते ७७ लाख ही संख्या आहे. ती नावे तशीच ठेवून विधानसभा निवडणूक घ्यावी असे थेट न म्हणता तशीच अपेक्षा विरोधी पक्ष करत आहेत. तर मृत मतदारांच्या नावावर बोगस मतदान होऊ द्यायचे का, जे आता बिहारऐवजी देशातील अन्य विधानसभेचे मतदार आहेत त्यांच्या नावावर बोगस मतदान होऊ द्यायचे का, असा प्रश्न जर निवडणूक आयोग विचारत असेल तर तो चुकीचा नाही. भारताचे संविधान अपात्र लोकांना मतदान करण्याची परवानगी देत नाही. निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचे सूतोवाच आता विरोधी पक्षांकडून केले जाते आहे. तर लोकसभा निवडणुकीत अन्य राज्यांत काय प्रकार झाला त्याचीही उदाहरणे मांडली जात आहे.



जर कर्नाटकातील एका ठिकाणी शंभर टक्के बोगस प्रकार झालेला आम्हाला पाहायला मिळाला आणि त्याचे ठोस पुरावे आमच्याकडे आहेत तर अन्य ठिकाणीही असलेच प्रकार झाले असल्याची आमची खात्री आहे. मते चोरी करण्याचा हा प्रकार असल्याचे काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे म्हणणे आहे. तेलगू देसम हा केंद्रातील सत्ताधारी आघाडीतील पक्षही विरोधी पक्षांनी उपस्थित केलेल्या काही मुद्द्यांशी सहमत आहे. बिहारमधील सत्ताधारी पक्षाच्या आमदारानेही मतदार यादी पडताळणीला आक्षेप घेतला आहे. त्या राज्यातून येणार्या अन्य बातम्या पाहता सत्ताधारी पक्षाचे आमदारही या प्रकारामुळे धास्तावले आहे. त्याचे कारण कोणाचे नाव यादीतून कट होईल आणि त्याचा आपल्याला कसा फटका बसेल याबद्दल त्यांना भीती वाटते आहे.

ही भीतीच सगळ्या गदारोळाच्या मुळाशी असलेले कारण आहे. जर ७० ते ८० लाख बोगस नावे मतदार यादीत असतील आणि ते निदर्शनास येऊनही त्यात दुरूस्ती न करता निवडणूक घेण्याचा आग्रह नव्हे हट्टच धरला जात असेल तर या बोगस प्रकारात सत्ताधार्यांना आणि विरोधकांनाही आपले दडलेले हित दिसते आहे. यालाच आपण पारदर्शक आणि स्वच्छ निवडणूक प्रक्रिया म्हणत होतो का? मतदार यादी स्वच्छतेची प्रक्रिया केव्हा सुरू केली गेली याला विरोध करताना स्वच्छतेची प्रक्रिया मान्य करण्याचे मोठेपणही भारतातील राजकीय पक्षांनी राजकीय विचारसरणीच्या पलिकडे जाऊन दाखवले पाहिजे.

# चेहऱ्यावर दिसून येणारी ही लक्षणे किंचाळून किंचाळून देत असतात "Heart' खराब होण्याचे संकेत; दुर्लक्षित केल्यास पडेल महागात

बदलत्या काळात मानव प्रगत होत असला, नवनवीन तंत्रज्ञान जन्माला येत असले तरी मानवाची प्रकृती मात्र दिवसेंदिवस ढासळत चालली आहे. बदलते वातावरण, खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी आणि व्यायामाकडे दुर्लक्ष या सर्वांमुळेच आपले आरोग्य खराब होत चालले आहे त्यामुळे जवळजवळ प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या आजाराने ग्रस्त आहे. अनेकदा हे आजार सुरुवातीला लहान असतात पण याकडे दुर्लक्ष केल्याने आणि वेळेत उपचार न घेतल्यामुळे ते मोठे होत जातात आणि मग ऐनवेळी उपचार घेऊनही माणसाचा जीव वाचला जात नाही.

दातांना लागलेली काळी कीड कायमची होईल नष्ट! दातांच्या पोकळीपासून सुटका मिळवण्यासाठी करून पहा 'हे' घरगुती उपाय

कोणताही आजार होण्याआधी आपल्याला आपले शरीर त्यासंबधीत काही संकेत देत असतो जे वेळीच ओळखल्यास आपण त्या आजारांना वेळीच दूर पळवू शकतो आणि स्वतःला सुरक्षित बनवू शकतो. चुकीच्या जीवनशैलीमुळे हृदयविकाराचा धोका फार वाढला आहे अशात आम्ही तुम्हाला सांगतो की, शरीरावर दिसून येणारी काही लक्षणे तुम्हाला यासंबंधित काही संकेत देत असतात ज्यांना ओळखून तुम्ही तुमचे हृदय निरोगी बनवू शकता. चला ही लक्षणे कोणती आहेत याविषयी सविस्तर माहिती जाणून घेऊया.

ही लक्षणे त्वचेवर दिसतात. त्वचा निळी पडणे जर तुमची त्वचा वारंवार निळी होत असेल तर ते हृदयरोगाचे लक्षण असू शकते. याला सायनोसिस असेही म्हणतात. हा रंग रक्तातील ऑक्सिजनची पातळी कमी झाल्यामुळे येतो, ज्यामुळे त्वचेखालील रक्तवाहिन्यांमधील रक्त निळे दिसू लागते. जेव्हा हृदय आजारी असते तेव्हा सहसा ओठ, बोटे किंवा पाय निळे पडण्याची लक्षणे दिसू लागतात.

डोळ्याभोवती पिवळे डाग पडणे बहुतेकदा जेव्हा आपले हृदय खराब होत असते तेव्हा आपल्या डोळ्यांभोवती अथवा पापण्यांवर पिवळे डाग दिसू लागतात. हे दर्शवते की, तुमच्या रक्तातील कोलेस्टेरॉलची पातळी वाढली आहे. तुमच्यासोबतही असे काही होत असेल तर वेळीच हॉस्पिटल गाठा आणि यावर डॉक्टरांचा योग्य तो सल्ला घ्या.

पायांना सूज येते सामान्य वाटतं असलेले हे लक्षण तुम्हाला तुमच्या हृदयाचे आरोग्य दर्शवत असते. जर दय रक्त योग्यरित्या पंप करू शकत नसेल तेव्हा आपल्या पायांत अथवा घोट्यांमध्ये सूज येण्याची समस्या जाणवू लागते. सतत ही समस्या जाणवत असेल तर यावर वेळीच इलाज करणे गरजेचे आहे.

चेहऱ्यावर घाम येणे घाम येणे ही एक सामान्य गोष्ट आहे पण उष्णता ना जाणवताही सतत जर चेहऱ्यावर घाम येत असेल तर हे हृदयरोगाचे लक्षण असू शकते. जेव्हा आपले हृदय कमकुवत होऊ लागते, जेव्हा त्याला आवश्यकतेपेक्षा जास्त काम करावे लागते तेव्हा चेहऱ्यावर घाम येऊ लागते. यासहच चेहऱ्यावर लहान मुरुमे येणे हे देखील हृदयरोगाचे लक्षण असू शकते.

F-Qs (संबंधित प्रश्न) हृदयरोगाची लक्षणे कोणती? छातीत दुखणे किंवा अस्वस्थता, श्वास घेण्यास त्रास होणे, हृदयाची धडधड वाढणे आणि महिलांमध्ये थकवा, अपचन आणि जबडा किंवा पाठीच्या वरच्या भागात वेदना ही लक्षणे असू शकतात.

हृदयरोगासाठी कोणते जोखीम घटक आहेत? उच्च रक्तदाब, उच्च कोलेस्ट्रॉल, मधुमेह, लठ्ठपणा, धूम्रपान, शारीरिक निष्क्रियता आणि कौटुंबिक इतिहास हे जोखीम घटक आहेत.

# सकाळच्या नाश्त्यासाठी झटपट बनवा हेल्दी टेस्टी ओट्स स्मूदी, नोट करून घ्या पदार्थ

सकाळच्या नाश्त्यात प्रत्येकालच काहींना काही हेल्दी आणि टेस्टी पदार्थ खाण्याची इच्छा होते. अनेक घरांमध्ये सकाळच्या नाश्त्यासाठी कांदापोहे, उपमा, शिरा किंवा इडली, डोसा बनवला जातो. मात्र नेहमीच तेच ठराविक पदार्थ खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची सगळ्यांचं होते. अशावेळी तुम्ही सोप्या पद्धतीमध्ये ओट्स स्मूदी बनवू शकता. ओट्स खाणे आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक आहे. त्यामुळे वाढलेले वजन कमी करताना सकाळच्या नाश्त्यासाठी ओट्स खाऊ शकता. ओट्समध्ये फायबर, प्रोटीन आणि आवश्यक जीवनसत्वे मोठ्या प्रमाणावर आढळून येतात. त्यामुळे




सकाळच्या नाश्त्यात स्मूदीचे सेवन करावे. ओट्स स्मूदी लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं खूप जास्त आवडते. त्यामुळे कमीत कमी वेळात झटपट कोणता पदार्थ बनवायचा असल्यास तुम्ही ओट्स स्मूदी बनवू शकता. चला तर जाणून घेऊया ओट्स स्मूदी बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:
ओट्स
दूध
काजू
बदाम
मध
केळ
इतर आवडीची कोणतीही फळे

कृती:

ओट्स स्मूदी बनवण्यासाठी सर्वप्रथम, ओट्स पाण्यात काहीवेळ पाण्यात भिजत ठेवा.

मिक्सरच्या भांड्यात केळीची तुकडे, मध, दूध आणि काजू, बदाम टाकून बारीक पेस्ट तयार करा.

त्यानंतर त्यात भिजवलेले ओट्स टाकून पुन्हा एकदा व्यवस्थित पेस्ट तयार करा.

काचेच्या ग्लासात स्मूदी ओतून वरून काजू बदामाचे तुकडे आणि तुमच्या आवडीची फळे टाकून सेवन करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली ओट्स स्मूदी.

# साधी, सोपी, चवदार डिश! घरी बनवा आंबट-गोड कढी पकोडा; चवीला मजेदार सर्व कुटूंबियांना करेल खुश

कढी पकोडा ही एक पारंपारिक आणि चविष्ट अशी डिश आहे जी दह्यापासून तयार केली जाते. आंबट-गोड चवीने भरलेल्या या डिशमध्ये कुरकुरीत बेसनाचे पकोडे टाकले जातात जे या डिशची चव आणखीनच बहारदार बनवतात. कढी बहुतेकदा गरमा गरम भातासोबत खाल्ली जाते पण तुम्हाला हवं असल्यास तुम्ही चपातीसोबतही याचा आस्वाद घेऊ शकता.



ही एक झटपट आणि काही मिनिटांतच तयार होणारी रेसिपी आहे ज्यामुळे रात्रीच्या जेवणासाठी हा एक उत्तम पर्याय ठरतो. खमंग तडका देऊन तयार केलेली डिश आणि त्यात सॉफ्ट झालेले पकोडे यांचा संगम चवीला खरोखर सुखावून जातो. काही साधं, सोपं खावंस वाटत असल्यास कधी पकोड्याची ही रेसिपी एकदा घरी नक्की बनवून पहा. लगेच नोट करून घेऊयात यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य:
पकोड्यासाठी:
बेसन – १ कप
कांदा (चिरलेला) – १ मध्यम
हळद – ञ टीस्पून
लाल तिखट – ट टीस्पून
जिरं – ट टीस्पून
मीठ – चवीनुसार
तेल – तळण्यासाठी
पाणी – गरजेप्रमाणे
कढीसाठी:
ताक – २ कप (आंबट ताक वापरावे)
बेसन – २ टेबलस्पून
हळद – ञ टीस्पून
मीठ – चवीनुसार
पाणी – २ कप
तेल – १ टेबलस्पून
मोहरी – ट टीस्पून
जिरं – ट टीस्पून
हिंग – १ चिमूट
हळद – ञ टीस्पून
सुकी लाल मिरची – १-२
कढीपत्ता – ७-८ पाने
आले-लसूण पेस्ट – १ टीस्पून
हिरव्या मिरच्या – १-२ (चिरलेल्या)

श्रावणातील नैवेद्यासाठी घरीच बनवा पारंपरिक पद्धतीने पंचामृत, पदार्थाला लगेच आजीच्या हाताची चव

कृती: यासाठी सर्वप्रथम एका बाऊलमध्ये बेसन, कांदा, हळद, तिखट, मीठ, जिरे आणि थोडे पाणी घालून मिश्रण मिक्स करा

गरम तेलात छोटे पकोडे सोडून तळून घ्या. हे कुरकुरीत आणि सोनसळी रंगाचे होईपर्यंत तळा. बाजूला ठेवा.

एका बाऊलमध्ये ताक, बेसन, हळद, मीठ आणि पाणी एकत्र करून गुठळ्या होणार नाहीत याची काळजी घेत मिक्स करा.

एका पातेल्यात तेल गरम करून त्यात मोहरी, जिरे, हिंग, लाल मिरची, कढीपत्ता, आले-लसूण पेस्ट आणि

हिरव्या मिरच्या टाका. फोडणी चांगली खमंग होईपर्यंत परतून घ्या.

तयार ताकाचं मिश्रण फोडणीत ओता आणि मध्यम आचेवर उकळू द्या. सतत ढवळत रहा. कढी थोडी घट्ट होईपर्यंत शिजवा (१०-१२ मिनिटं).

कढी शिजल्यावर त्यात पकोडे घालून ४-५ मिनिटं एकत्र शिजवा.

चवीनुसार मीठ तपासा. कढी पकोडा गरम गरम भातासोबत, किंवा चपातीसोबत सर्व्ह करा.

पकोडे अजून कुरकुरीत हवे असतील तर त्यांना दोनदा तळा.

ताक नसेल तर दही आणि पाणी मिसळून

# दातांना लागलेली काळी कीड कायमची होईल नष्ट! दातांच्या पोकळीपासून सुटका मिळवण्यासाठी करून पहा 'हे' घरगुती उपाय

हल्ली प्रत्येक व्यक्तीला दातांच्या समस्या उद्भवू लागतात. दातांना कीड लागणे, हिरड्यांमधून रक्त येणे, हिरड्यांना सूज येणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. दातांच्या समस्या उद्भवू लागल्यानंतर अनेक लोक दुर्लक्ष करतात, मात्र सतत दुर्लक्ष केल्यामुळे तोंडाच्या समस्या उद्भवून दातांना हानी पोहचण्याची जास्त शक्यता असते. दातांना कीड लागल्यानंतर सुरुवातीच्या टप्प्यात हिरड्यांमध्ये बारीक काळा डाग दिसू लागतो. त्यानंतर हळूहळू तिथे छिद्र बनतो आणि वेदना होण्यास सुरुवात होते. दातांमध्ये पोकळी निर्माण झाल्यानंतर बऱ्याचदा असह्य वेदना होऊ लागतात. जास्त गोड पदार्थ खाणे, दात न स्वच्छ करणे किंवा योग्यरित्या ब्रश न केल्यामुळे दातांमध्ये कीड लागण्याची शक्यता असते. आज आम्ही तुम्हाला दातांना लागलेली कीड नष्ट करण्यासाठी काही घरगुती उपाय सांगणार आहोत. हे उपाय करून दातांना लागेल कीड नष्ट होईल आणि वेदनांपासून सुटका मिळेल.



दातांना कीड लागण्याची कारणे:

सतत गोड पदार्थ खाणे, जेवणानंतर दात स्वच्छ न करणे, हिरड्यांच्या समस्या, दातांमध्ये पडलेला खड्डा इत्यादी अनेक गोष्टींमुळे दात खराब होऊ लागतात. दात खराब झाल्यानंतर तोंडातून दुर्गंधीचा घाणेरडा वास येऊ लागतो. तर बऱ्याचदा लक्षणे वाढल्यानंतर दात तुटणे किंवा पडणे, तोंडाची दुर्गंधी, सूज किंवा पू येणे, ताप किंवा संसर्ग होणे इत्यादी अनेक समस्या उद्भवतात.

लवंग: भारतीय मसाल्यांमध्ये असलेले गुणधर्म केवळ जेवणाची चवच नाहीतर आरोग्यासाठी सुद्धा अतिशय प्रभावी असतात. दातांमध्ये लागलेली कीड किंवा हिरड्यांच्या समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी लवंग गुणकारी ठरते. यासाठी लवंगाचा बारीक तुकडा कीड लागलेल्या ठिकाणी ठेवावा. त्यानंतर १५ मिनिटांनी दात पाण्याने स्वच्छ करून घ्यावे. लवंग दाताच्या आरोग्यासाठी अतिशय गुणकारी ठरते.

पेरूची पाने: दातांच्या संसर्गापासून आराम मिळवण्यासाठी पेरूची पाने अतिशय प्रभावी ठरतात. नियमित एक किंवा दोन पेरूची पाने चावून खाल्ल्यास तोंडात वाढलेली दुर्गंधी कमी होण्यास मदत होते. याशिवाय दातांवर वाढलेला पिवळा आणि पांढरा थर कमी करण्यासाठी पेरूची पाने महत्वाची ठरतात.

# पावसाळ्याच्या दिवसांमध्ये का वाढतो पायांच्या गॅंगरीनचा धोका? जाणून घ्या लक्षणे आणि पाय स्वच्छ ठेवण्यासाठी उपाय

संपूर्ण देशभरात मुसळधार पाऊस पडत आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे आरोग्यासंबंधित अनेक समस्या उद्भवू लागतात. या दिवसांमध्ये त्वचेवर इन्फेक्शन होण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळे त्वचेसह संपूर्ण आरोग्याची योग्य काळजी घ्यावी. पावसाळ्यात चिखल, खराब पाणी आणि इतर अनेक कारणामुळे पायांचा संसर्ग होण्याची जास्त शक्यता असते. त्यात अनेकांमध्ये दिसून येणारी समस्या म्हणजे गॅंगरीन. गॅंगरीन इन्फेक्शन झाल्यानंतर पायांचे आरोग्य पूर्णपणे बिघडून जाते आणि आरोग्यासंबंधित अनेक समस्या उद्भवू लागतात. गॅंगरीन झाल्यानंतर सुरुवातीच्या दिवसांमध्ये योग्य वेळी लक्ष न दिल्यास समस्या आणखीनच गंभीर होत जाते. याशिवाय पाय कापून टाकण्यास लागू शकतो.

पावसाळ्याच्या दिवसांमध्ये साथीच्या आजारांसोबतच त्वचा आणि पायांमध्ये इन्फेक्शन वाढण्याची जास्त शक्यता असते. पावसाळा ऋतू संसर्ग वाढवण्यासाठी अनुकूल ठरतो. त्यामुळे पावसाळ्यात हातापायांना कोणतीही जखम होणार नाही याची जास्त काळजी घ्यावी. मधुमेह, रक्ताभिसरण, पायाला जखमा पावसाळ्याच्या दिवसांमध्ये लवकर भरत नाहीत. गॅंगरीन हा अतिशय धोकादायक आणि जीवघेणा आजार आहे. ज्यामुळे रक्तवाहिन्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. हा संसर्ग झाल्यानंतर योग्य वेळी लक्ष न दिल्यास पाय कापावा लागतो, अन्यथा गॅंगरीन संपूर्ण शरीरात पसरण्याची जास्त भीती असते.

पायाचे गॅंगरीन म्हणजे काय? पायाचा गॅंगरीन होण्यामागे अनेक कारण आहेत. त्यातील प्रमुख कारण म्हणजे रक्तप्रवाहाच्या कमतरतेमुळे किंवा गंभीर जिवाणू संसर्गामुळे शरीरातील निरोगी पेशी मृत पावतात. ज्याचा परिणाम बोटांवर आणि संपूर्ण पायांवर होण्याची जास्त शक्यता असते. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये सतत जाणवणारा ओलसरपणा आणि घाणेरड्या पाण्यामुळे त्वचेचे नुकसान होते आणि संसर्गाचा धोका वाढू लागतो.



गॅंगरीन होण्यामागील कारणे:
रक्तभिसरण प्रक्रियेमध्ये अडथळे निर्माण होणे
जखमा किंवा अल्सर
बुरशीजन्य किंवा जिवाणू संसर्ग
ओल्या चपला
कमकुवत रोगप्रतिकारशक्ती

गॅंगरीन झाल्यानंतर शरीरात दिसणारी लक्षणे:
पायाच्या बोटांमध्ये सुन्नपणा जाणवणे
तीव्र वेदना
त्वचा काळीनिळी होणे
दुर्गंधीयुक्त स्त्राव किंवा पायांमधून पू येणे
ताप पायांवर वाढलेली सूज पायांचे गॅंगरीन टाळण्यासाठी सोप्या टिप्स:

पायांचा गॅंगरीन होऊ नये पावसाळ्याच्या दिवसांमध्ये ओल्या चप्पल किंवा मोजे परिधान करू नयेत. यामुळे पायांवर इन्फेक्शन वाढण्याची जास्त शक्यता असते. पायांवर फोड, जखम किंवा रंग बदलेला वाटू लागल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घेऊन उपचार करावे. घरातील लादीवर अनवाणी पायानी चालू नये. नेहमीच पाय कोरडे आणि स्वच्छ ठेवा.

कंबर आणि पोटावर वाढलेला चरबीचा घेर कमी करण्यासाठी स्वयंपाकघरातील 'हे' दोन पदार्थ ठरतील गुणकारी

F-Qs (संबंधित प्रश्न)

गॅंगरीन टाळण्यासाठी काय करावे?

रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवा. जखमा वेळेवर स्वच्छ करा आणि त्यावर योग्य उपचार करा.धूम्रपान रक्तवाहिन्यांचे नुकसान करते.नियमित व्यायामाने रक्तप्रवाह सुधारतो.

गॅंगरीन म्हणजे काय?

गॅंगरीन ही एक गंभीर वैद्यकीय स्थिती आहे ज्यामध्ये शरीराच्या एका भागाला रक्तपुरवठा पुरेसा होत नाही, ज्यामुळे ऊती मरतात.

## वासामुळे कांदा-लसूण खाणे सोडले आहे का? आरोग्याला मिळतात जबरदस्त फायदे, वाचाच

आपण आपल्या रोजच्या आहारात अनेक पदार्थांचा समावेश करत असतो. रोजचे पदार्थ तयार करताना असताना त्यात काही मसाले, किंवा काही पदार्थ मिसळणे हे अत्यंत महत्वाचे असते. तसेच आपल्या रोजच्या जेवणात कांदा आणि लसूण या दोन गोष्टींचा समावेश असतो. भारतीय जेवणांमध्ये यांचे महत्वाचे स्थान आहे. याशिवाय जेवण करणे ही कल्पना देखील केली जाऊ शकत नाही. भाजी, वरण, शाकाहारी आणि मांसाहारी पदार्थांमध्ये याचा समावेश केला आहे. कांदा आणि लसणाचे फायदे देखील आहेत. याबाबत अधिक माहिती जाणून घेऊयात. आयुर्वेदाच्या माहितीनुसार, कांदा आणि लसणाचे सेवन केल्याने प्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. तसेच आपल्या शरीराचे पचन तंत्र देखील मजबूत होण्यास मदत होते. कांदा कापताना भले आपल्याला रडवत असेल, लसणाचा वास नाकाला सहन होत नसेल. मात्र तुम्ही याचे फायदे वाचले तर तुम्ही रोज त्याचे सेवन करण्यास सुरुवात कराल.

कांदा आणि लसूण खाण्याचे फायदे रोग प्रतिकारक शक्ती: कांदा आणि लसणाचे सेवन केल्याने आपली प्रतिकार शक्ती वाढण्यास मदत होते. यामध्ये अँटी ऑक्साइड्स आणि अँटी बॅक्टेरीयल गुणधर्म आढळून येतात. याच्या सेवनाने तुम्ही अनेक आजारांपासून बचाव करू शकता. हृदयाच्या आरोग्यासाठी: कांदा आणि लसणाचे सेवन केल्याने तुमच्या शरीरातील कोलेस्ट्रॉल कमी किंवा कंट्रोल केले जाऊन शकते. तसेच शरीरातील ब्लड सर्क्युलेशन नीट होते. तसेच यांच्या सेवनाने हृदयाचे आरोग्य देखील सुधारण्यास मदत होते. सांधेदुखीपासून आराम: कांदा आणि लसणाचे सेवन केल्याने शरीराला अनेक फायदे होतात. कांदा आणि लसणाच्या पाण्यात अँटी इम्फ्लेन्ट्री गुण आढळून येतात. यामुळे सांधेदुखीपासून आराम मिळू शकतो. पचन तंत्र सुधारते: कांदा आणि लसणाच्या सेवनाने शरीराचे पाचन तंत्र सुधारण्यास मदत होते. जर का तुम्हाला अपचन, गॅस, कफ या समस्यांचा त्रास असेल तर, कांदा आणि लसणाचे सेवन करणे फायदेशीर ठरते.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त वृक्षारोपण नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या हस्ते संपन्न

केज/प्रतिनिधी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त वृक्षारोपण नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले तर मतिमंद व मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व अल्पपोहाराचे वाटप करण्यात आले. केज शहरातील सिद्धार्थ नगर भागामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कै. प्रमोद लांडगे युवा मंचच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून नगराध्यक्षा.सौ.सीताताई बनसोड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रोहित कसबे तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रीतम खरात, पत्रकार दशरथ चवरे, पत्रकार तात्या गवळी, युवा



नेते, लखन हजारे, पत्रकार विवेक बनसोड, किरण जोगदंड वंचितचे प्रवीण मस्के यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. यावेळी जयंती उत्सव समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्यावर प्रकाश टाकीत उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच मतिमंद व मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व अल्पपोहाराचे वाटप करण्यात आले. यावेळी मतिमंद निवासी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती जनाबाई जाधव मॅडम, मूकबधिर निवासी विद्यालयाच्या सूर्यवंशी मॅडम, काकासाहेब जगदाळे, अशोक सुरवसे, विशाल कदम, दुंबक पवार, ओके सर, बोधले सर, पवार सर, शिंदे सर, श्रीमती आंधळे मॅडम, श्रीमती जाधव मॅडम, पालवे सर व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष,सचिव, पदाधिकारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# साप आणि अंधश्रध्दा विषयी अंनिस राबवणार प्रबोधन सप्ताह

अहमदपूर/ प्रतिनिधी :- आपल्या समाजात सापांच्या विषयी मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा दिसून येतात त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र अंनिस मार्फत २९ जुलै ते ५ ऑगस्ट हा सप्ताह आपण सर्प विषयक प्रबोधन सप्ताह म्हणून साजरा केला जाणार आहे अशी माहिती महाराष्ट्र अंनिस मार्फत प्रसिद्धी पत्रकाचा मार्फत देण्यात आली आहे .

प्रसिद्धी पत्रकात पुढे असे म्हटले आहे की साप या सरपटणाऱ्या प्राण्यांविषयी समाजात आजही अनेक गैरसमज आहेत. साप हा शेतकऱ्याचा मित्र असल्या कारणामुळे कृषी संस्कृतीत त्याला अनन्यसाधारण महत्व आहे. नागपंचमीला पूज्य असणारा साप इतर दिवशी दिसला की काठी शोधून त्याची हत्या केली जाते हे टाळणे आवश्यक आहे, सापविषयी असलेल्या विविध अंधश्रद्धा मागील फोलपणा लोकांना कळावा यासाठी हे प्रबोधन शाखा मार्फत शाळा,महाविद्यालय , गावात, महिला गटात घेण्यात येणार आहे.या मध्ये

*साप या वन्यजीवाचे पर्यावरण साखळीतील महत्व सांगणे.

*विषारी आणि बिनविषारी साप कोणते याची माहिती देणे.

*आपल्या घरात साप येऊ नये यासाठी घ्यावयाची काळजी.

*सर्प दंश झालाच तर ताबडतोब सरकारी/ खाजगी रुग्णालयात जाऊन उपचार घेणे.

*सर्प, कुत्रा, विंचू चावला तर विष उतरवण्यासाठी घरगुती उपचार, मांत्रिक यांच्याकडे जाऊन झाडफूक, तंत्र मंत्र करणे टाळावे.

ही सोपी माहिती देण्यात येणार आहे इच्छुक शाळा महाविद्यालये आणि नागरिकांनी अहमदपूर अंनिस शाखेशी संपर्क करावा असे आवाहन अंनिस शाखा अध्यक्ष उद्धव इप्पर, डॉ अतुल खडके ,मेघराज गायकवाड, प्रा रत्नाकर नळेगावकर,अजहर बागवान, चंद्रशेखर भालेराव, सुरेश डबीर, संगीता खंडागळे, सुरेखा उपरवाड,शोभा घोडके, याच्यावतीने करण्यात आले

# बाबासाहेबांचे भव्य दिव्य स्मारक तळेगाव दाभाडे येथे उभे राहावे- ॲड.रंजना भोसले.

तळेगाव :- देहू रोड येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सन १९५४ रोजी प्रथम बुद्ध रूप बसून धम्माचा प्रारंभ केला असे म्हणणे योग्य होईल,याच परिसरात म्हणजे तळेगाव दाभाडे येथे विद्यापीठ स्थापन करण्यासाठी ४१ एकर जागा खरेदी केली होती व त्या ठिकाणी बंगला बांधून काही काळ त्यांनी त्या ठिकाणी घालावला होता. परंतु त्यांचे विद्यापीठ स्थापन करण्याचे स्वप्न पूर्ण झाले नाही.सन १९६० रोजी बंगल्यास ४१ एकर जागा ॲडमिनीस्ट्रेटर जनरल मुंबई यांनी विक्री केली होती.बाबासाहेबांचे भव्य दिव्य स्मारक तळेगाव दाभाडे येथे उभे राहावे यासाठी सहकार्य करा.ॲड.रंजना भोसले अध्यक्ष विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती तळेगाव दाभाडे यांनी जाहीर आवाहन केले आहे.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तळेगाव दाभाडे येथील स्मारकासाठीची चर्चा करण्यासाठी स्मारक समितीचे अध्यक्ष ॲड.रंजना रघुनाथ भोसले यांच्या नेतृत्वाखाली व मान.यशवंत मानखेडकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली समाजातील प्रतिष्ठित नागरिक विविध क्षेत्रातील अधिकारी वर्ग सेवा नियुक्त अधिकारी तसेच विविध क्षेत्र कार्यात असलेले युनियनचे पदाधिकारी यांची एक बैठक रविवार दिनांक २७ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता बहुजन हिताय बौद्ध विहार,माता रमाबाई चौक सिद्धार्थ नगर कल्याण पूर्व येथे आयोजित करण्यात आली होती.त्याला अनेक मान्यवरांनी उपस्थिती दाखवली.आम्ही विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तळेगाव दाभाडे स्थापना २००४ ला करून कोणत्याही प्रकारचे आंदोलन न करता केवळ प्रशासकीय स्तरावर आठ वर्षे संघर्ष करून सन २०१२ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वास्तव केलेल्या बंगल्याला सर्वांसाठी खुले करून नगरपरिषद तळेगाव दाभाडे यांच्या ताब्यात दिला आहे.आज रोजी तो सर्वांसाठी खुला असून या बंगल्याला दररोज आंबेडकर अनुयायी देशभरातून भेट देत असतात.अशी ॲड. रंजना रघुनाथ भोसले यांनी माहिती दिली.

पुढे त्यांनी सांगितले की डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या निवासस्थानांना बंगल्या शेजारी भूखंड क्रमांक २९ ते ३४ असून स्मारकासाठी आरक्षित करावे म्हणून आम्ही संस्थेच्या वतीने सन २००८ पासून तळेगाव दाभाडे महानगरपालिकडे सतत मागणी करीत आले आहे.तळेगाव दाभाडे नगर परिषदेने आमच्या मागणीनुसार दुसऱ्या नवीन सुधारित विकास योजनेच्या आखाड्यामध्ये वरील भूखंडावर आरक्षित करून महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठवले होते परंतु महाराष्ट्र शासनाने कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता २०१३ रोजी रद्द केला आहे. तेव्हापासून आम्ही शासनाकडे भूखंड क्रमांक २९ ते ३४ हे आरक्षित करावे म्हणून पत्र व्यवहार करीत आहोत परंतु शासनाकडून पाहिजे तसा प्रतिसाद मिळत



नाही किंवा बाबासाहेबांचे भव्य दिव्य स्मारक तळेगाव दाभाडे येथे उभे राहावे असे वाटत नाही.शासन प्रशासन आम्हाला प्रतिसाद देत नाही.याबाबत तळेगाव दाभाडे नगरपरिषदेवर मोर्चा काढण्यात आला होता.परंतु खोट्या आश्वासनाशिवाय काही हाती आले नाही.म्हणून आम्ही वरील भूखंड संस्थेच्या वतीने खरेदी करून त्या ठिकाणी भव्य दिव्य स्मारकासह बौद्ध प्रशिक्षण केंद्र वाचनालय (ग्रंथालय) भंतेनिवास,स्पर्धा परीक्षेचे वर्ग व इतर बरेचसे उपक्रम राबविण्याचा आमच्या संस्थेचा मानस आहे. ही सर्व जागा २९ गुंठे अर्थात पाऊन एकर आहे. व त्याची किंमत कोटीच्या घरात आहे आणि ती विकत घेण्याचा आपल्या सर्वांच्या माध्यमातून आमचा प्रयत्न आहे. हा ऐतिहासिक लढा केवळ तळेगांव दाभाडे च्या रहिवाशा पुरता मर्यादित न ठेवता महाराष्ट्रातील सर्व आंबेडकरी विचारांच्या अनुयायांनी त्यात तन-मन,धन देऊन सहकार्य करावे.जबाबदारी घ्यावी यासाठी अशा बैठकीचे आयोजन करण्यात येत आहे.आपणास विनंती तसेच आवाहन करते ते की याकरीता आपल्या सहकाऱ्याची आवश्यकता आहे.असे ॲड.रंजना भोसले अध्यक्ष यांनी सांगितले. या बैठकीला सागर रामभाऊ तायडे पत्रकार साहित्यिक कामगार नेते,विनोद शामरावजी वावरे,दादासाहेब यादव,दिलीप शिवराम जाधव,अमोल जगधने,माधुरी सपकाळे,शशिकांत सावंत,ॲड.उदय रसाळ,शालिनी औचार,वसंत सपकाळे,परमानंद मेश्राम,राजीव साळवी,अविनाश जाधव,उदय रसाळ माजी नगरसेवक,भागवत बिराडे यांनी या कार्यक्रमास सहभाग घेतला.किसन थुल सचिव यांनी प्रास्ताविक केले,तर सुरेश श्रीपत जाधव यांनी सूत्रसंचालन केले,दादासाहेब यादव यांनी आभार मानले.विश्वस्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर समिती संचालक तळेगाव दाभाडे,दादासाहेब यादव,सुरेश श्रीपत जाधव,अँड.सुरज वासनिक यांची मुंबई समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

# केवळ ३ दिवसात १००० हून अधिक मालमत्ता धारकानी घेतला सूट चा लाभ

लातूर/प्रतिनिधी :- कर संकलन व कर आकारणी विभाग, लातूर शहर महानगरपालिका मार्फत वर्षाच्या सुरुवातीस नियमितपणे कर भरणारे मालमत्ता धारकासाठी विविध सुट/ सवलती देण्यात आले आहेत. त्यानुसार ३१ जुलै पर्यंत मालमत्ता कर`पश्रळपश भरणा-यास १० % व ऑफलाइन भरणाऱ्यास ५% सवलत देण्यात आली आहे . सदरील योजनेस मालमत्ताधारकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून शनिवार, रविवार सुटीच्या दिवशी सुद्धा १००० हून अधिक नागरिकांनी आपला टॅक्स भरून सुट चा लाभ घेतला . मनपा आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी यांच्या आदेशानुसार व उपायुक्त (कर संकलन) डॉ पंजाब खानसोळे यांच्या नियोजनानुसार सर्व क्षेत्रीय कार्यालयांना सुट्टीच्या दिवशी सुद्धा कर संकलनाचे आदेश दिले होते. त्यानुसार सर्व क्षेत्रीय अधिकारी व टॅक्स विभागाचे कर्मचारी यांनी मेहनत घेऊन सुट्टीच्या दिवशी सुद्धा नागरिकांना टॅक्स भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. शनिवार ते सोमवार या ३ दिवसात तब्बल १ हजार हून अधिक मालमत्ता धारकानी ३.५ लाख सूट रकमेचा लाभ घेऊन आपला ९० लाख



रुपयांचा टैक्स भरणा केला आहे. तरी चालू वर्षातील मालमत्ता धारकांसाठी ही शेवटची संधी असल्याने ३१ जुलै पूर्वी आपला टैक्स भरून सूट चा लाभ घ्यावा व सहकार्य करावे असे आव्हान उपायुक्त (कर संकलन) डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे कर भरणा करण्यासाठी mclatur.org, Latur Property Tax सिटीझन ॲप किंवा propertytax.mclatur.in या वेबसाईटचा वापर करावा . किंवा आपल्या वसुली लिपिक, क्षेत्रीय कार्यालय, व मनपा मुख्यालय येथे आपल्याकडील देय कराचा भरणा करून वरील देण्यात आलेल्या सवलतीचा लाभ घेण्यात यावा.

# मेहबूबा मुफ्ती यांचे मोठे विधान ; म्हणाल्या,मोदींच्या मनात आलं तर ते काश्मीर

जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती यांनी पुन्हा एकदा पाकिस्तानशी चर्चेचे संकेत दिले आहेत. पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी (पीडीपी) च्या २६ व्या स्थापना दिनानिमित्त श्रीनगरमध्ये एका जाहीर सभेला संबोधित करताना मुफ्ती यांनी , जर मोदींना हवे असेल तर ते काश्मीर समस्या सोडवू शकतात. त्यांनी लाहोरला जाऊन प्रयत्न केले आणि जर त्यांना हवे असेल तर ते ते करू शकतात. असे मोठे विधान केले आहे.



मेहबूबा मुफ्ती यांनी या कार्यक्रमाच्या वेळी, मी दिल्ली सरकारला सांगू इच्छिते की, जम्मू आणि काश्मीरच्या लोकांना शांतता हवी आहे, पण आदराने. सैन्य आणून आणि लोकांना तुरुंगात टाकून शांती मिळणार नाही. असे म्हणत सरकारवर टीका देखील यावेळी केली. मोठ्या भावाची भूमिका साकारणे मेहबूबा मुफ्ती पुढे म्हणाल्या भारताने मोठ्या भावाची भूमिका बजावली पाहिजे आणि सर्वांशी बोलले पाहिजे. आपण युद्धाच्या उंबरठ्यावरून परत आलो आहोत आणि मला माहित नाही की आपण काय साध्य केले? असे म्हणत त्यांनी ऑपरेशन सिंदुरवर भाष्य केले. तसेच पुढे बोलताना, मी परराष्ट्र मंत्र्यांना एक सवाल करू इच्छिते कि आपण जेव्हा जेव्हा बोलतो तेव्हा परराष्ट्र धोरणाचा उल्लेख करून आपल्याला गप्प केले जाते. जम्मू आणि काश्मीरशिवाय परराष्ट्र धोरण काय? असेही त्यांनी यावली म्हटले. मेहबूबा मुफ्ती यांची घोषणाबाजी यावेळी मेहबूबा मुफ्ती यांनी शांततेचे नारे दिले. ते म्हणाले, युद्धानंतर शस्त्रास्त्रांची स्पर्धा सुरू झाली. भारत आणि पाकिस्तानमध्ये अधिकाधिक शस्त्रास्त्रे खरेदी केली जात आहेत. पाकिस्तान कर्जात बुडाला आहे आणि आपण चीनशी स्पर्धा करू शकत नाही. मी हे म्हणत नाही, भारताचे परराष्ट्र मंत्री हे म्हणतात. असे म्हणत त्यांनी रविशंकर यांच्यावर निशाणा साधला. मेहबूबा मुफ्ती म्हणाल्या, मी परराष्ट्रमंत्र्यांना सांगू इच्छिते की आम्ही भारताच्या परराष्ट्र धोरणात हस्तक्षेप करत राहू कारण तुमची प्रत्येक लढाई काश्मीरमध्ये लढली जाते. मग ती पहलगाम हल्ला असो किंवा ऑपरेशन सिंदूर. मुस्लिमांवर अत्याचार होत आहेत पीडीपी प्रमुख मुफ्ती यांनी यावेळी,देशात मुस्लिमांवर अत्याचार होत आहेत. बांगलादेशी असल्याच्या आरोपावरून समुद्रात फेकले जात आहे. जर तुम्हाला आमची जमीन हवी असेल तर आम्हाला सांगा आणि आम्ही दुसरीकडे जाऊ.असे देखील त्यांनी यावेळी म्हटले. त्यासोबतच त्यांनी, जर भारताला जागतिक नेता बनायचे असेल, तर त्याला युद्धाबद्दल बोलणे थांबवावे लागेल आणि शांतता आणि सौहार्दाबद्दल बोलायला सुरुवात करावी लागेल. पीडीपी शांततेत देशाला पाठिंबा देऊ इच्छिते.

# भीतीमुळे पाकिस्तानने अक्षरशः हात टेकले ; राजनाथ सिंह ऑपरेशन सिंदूरबद्दल काय म्हणाले?

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात सोमवारी लोकसभेत ऑपरेशन सिंदूरवर विशेष चर्चा होत आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी संसदेत ऑपरेशन सिंदूरबद्दल बोलताना सांगितले की, भारताच्या हल्ल्यांच्या भीतीने पाकिस्तानने अक्षरशः हात टेकले होते. संरक्षण मंत्री म्हणाले की, ६ आणि ७ मे २०२५ रोजी भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर नावाची ऐतिहासिक लष्करी कारवाई केली. ही केवळ लष्करी कारवाई नव्हती, तर ती भारताच्या सार्वभौमत्वाप्रती, त्याच्या अस्मितेप्रती आणि देशातील नागरिकांप्रती आपली जबाबदारी होती.

संरक्षणमंत्र्यांनी सांगितले की, ऑपरेशन सिंदूर करण्यापूर्वी आमच्या सैन्याने प्रत्येक पैलूचा सखोल अभ्यास केला होता. आमच्याकडे अनेक पर्याय होते, परंतु आम्ही असा पर्याय निवडला ज्यामध्ये दहशतवादी आणि त्यांच्या लपण्याच्या ठिकाणांना जास्तीत जास्त नुकसान झाले आणि ज्यामध्ये पाकिस्तानातील सामान्य नागरिकांना कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नाही.

राजनाथ सिंह म्हणाले, सर्वप्रथम, या सभागृहाद्वारे मी देशाच्या त्या शूर सुपुत्रांना, त्या शूर सैनिकांना सलाम करतो, जे या देशाच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी नेहमीच तयार असतात. यासोबतच, भारताची एकता आणि अखंडता सुनिश्चित करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सैनिकांच्या स्मृतीलाही मी सलाम करतो.

१०० हून अधिक दहशतवादी ठार आपल्या सैन्याने केलेल्या समन्वयित हल्ल्यांमध्ये, ९ दहशतवादी अड्ड्यांवर हल्ला करण्यात आला. एका अंदाजानुसार, या लष्करी कारवाईत शंभराहून अधिक दहशतवादी, त्यांचे प्रशिक्षक, हँडलर आणि सहकारी मारले गेले आहेत. त्यापैकी बहुतेक जण जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तैयबा आणि हिजबुल मुजाहिदीन सारख्या दहशतवादी संघटनांशी संबंधित होते. या त्याच दहशतवादी संघटना आहेत ज्यांना पाकिस्तानी सैन्य आणि आयएसआयचा उघड पाठिंबा आहे.

संरक्षणमंत्र्यांनी पुढे सांगितले की, आमची कारवाई पूर्णपणे स्वसंरक्षणार्थ होती, ती चिथावणीखोर नव्हती. तरीही १० मे २०२५ रोजी पहाटे १:३० वाजता पाकिस्तानने भारतावर मोठ्या प्रमाणात क्षेपणास्त्रे, ड्रोन, रॉकेट आणि इतर लांब पल्ल्याच्या शस्त्रांचा वापर केला. संरक्षणमंत्र्यांनी पुढे म्हटले की, मला हे सांगताना अभिमान वाटतो की आमच्या हवाई संरक्षण प्रणाली, काउंटर ड्रोन प्रणाली आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांनी पाकिस्तानचा हा हल्ला पूर्णपणे हाणून पाडला.

पाकिस्तान आमच्या लक्ष्यांवर हल्ला करू शकले नाही पाकिस्तान आमच्या कोणत्याही लक्ष्यांवर हल्ला करू शकले नाही. आमची सुरक्षा व्यवस्था कडक होती आणि प्रत्येक हल्ला रोखण्यात आला. यासाठी, शत्रूचा प्रत्येक कट उधळून लावणाऱ्या भारतीय सैन्याच्या शूर सैनिकांचे मी खूप कौतुक करतो. ते पुढे म्हणाले, पाकिस्तानने केलेल्या या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून आमची कारवाई धाडसी, ठोस आणि प्रभावी होती. भारतीय हवाई दलाने पश्चिम आघाडीवरील पाकिस्तानचे विमानतळ, कमांड अँड कंट्रोल सेंटर, लष्करी पायाभूत सुविधा आणि हवाई संरक्षण प्रणालींना लक्ष्य केले. हे मिशन आमच्या सैन्याने यशस्वीरित्या पार पाडले. पाकिस्तानच्या प्रत्येक कृतीला योग्य उत्तर देण्यात आले राजनाथ सिंह पुढे म्हणाले, ऑपरेशन सिंदूर हे त्रिकोणी



सेवा समन्वयाचे एक उत्तम उदाहरण बनले. जेव्हा भारतीय हवाई दलाने आकाशातून हल्ला केला तेव्हा आपल्या सैन्याने जमिनीवर आघाडी घेतली. आपले सैनिक पूर्ण ताकदीने नियंत्रण रेषेवर उभे राहिले आणि पाकिस्तानच्या प्रत्येक कृतीला योग्य उत्तर दिले. ते पुढे म्हणाले, या ऑपरेशनचा उद्देश दहशतवादी तळांना आणि त्यांच्या समर्थकांना लक्ष्य करणे, त्यांना नष्ट करणे आणि दहशतवादाविरुद्ध भारत शून्य सहनशीलता बाळगतो असा स्पष्ट संदेश देणे होता. भारताने कारवाई का थांबवली? संरक्षणमंत्र्यांनी भारताने कारवाई का थांबवली या प्रश्नाचे उत्तर देखील दिले. ते म्हणाले, संघर्षापूर्वी आणि दरम्यान ठरवलेले सर्व राजकीय आणि लष्करी उद्दिष्टे आम्ही पूर्णपणे साध्य केली होती म्हणून भारताने ही कारवाई थांबवली. म्हणून, कोणत्याही दबावाखाली ही कारवाई थांबवण्यात आली असे म्हणणे किंवा मानणे निराधार आणि पूर्णपणे चुकीचे आहे.

ते पुढे म्हणाले, पाक-पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यात आपल्या प्रियजनांना गमावलेल्या निष्पाप कुटुंबांना न्याय मिळवून देण्यासाठी ऑपरेशन सिंदूर सुरू करण्यात आले. आमच्या सैन्याने फक्त अशा लोकांना लक्ष्य केले जे या दहशतवाद्यांना पाठिंबा देऊन भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न करत होते. ऑपरेशन सिंदूरचा उद्देश दहशतवादाच्या स्वरूपात प्रॉक्सी युद्ध लढणाऱ्या पाकिस्तानला शिक्षा करणे हा होता. म्हणूनच सैन्याला स्वतःचे लक्ष्य निवडण्याचे आणि योग्य उत्तर देण्याचे पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले.

विरोधी पक्ष विचारतोय की किती विमाने पाडण्यात आली

राजनाथ सिंह म्हणाले, ऑपरेशन सिंदूर का सुरू करण्यात आले याची माहिती आधी देण्यात आली होती आणि मी ती आज सभागृहातही दिली आहे. विरोधी पक्षातील काही लोक विचारत आहेत की आमची किती विमाने पाडण्यात आली? मला वाटते की त्यांचा प्रश्न आमच्या राष्ट्रीय जनभावनांचे योग्य प्रतिनिधित्व करू शकत नाही. त्यांनी आम्हाला एकदाही विचारले नाही की आमच्या सैन्याने किती शत्रू विमाने पाडली? जर त्यांना प्रश्न विचारायचा असेल तर त्यांचा प्रश्न असा असावा की भारताने दहशतवाद्यांचे अड्डे नष्ट केले का, ज्याचे उत्तर हो आहे. ऑपरेशन सिंदूर का थांबवण्यात आले संरक्षणमंत्र्यांनी सांगितले की, १० मे रोजी पाकिस्तानच्या डीजीएमओने भारताच्या डीजीएमओशी संपर्क साधला आणि लष्करी कारवाया थांबवण्याचे आवाहन केले. मी सभागृहात पुन्हा सांगू इच्छितो की पाकिस्तानच्या डीजीएमओने भारताच्या डीजीएमओशी संपर्क साधला आणि लष्करी कारवाया थांबवण्याचे आवाहन केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE